जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३९८ दिनांक - २९/०५/२०२३

### अंमली पदार्थ विरोधी पथक ०२, गुन्हे शाखा,पुणे शहर

### विशेष मोहिमे अंतर्गत चतुश्रृंगी व बंडगार्डन पोलीस ठाणेच्या हद्दीत छापा कारवाई करुन एल.एस.डी. ओझीकुश गांजा, एम.डी.एम.ए.च्या पिल्स तसेच गांजा या अंमली पदार्थाची विक्री करणा-या चार इसमांकडुन एकुण १८,२५,४७५/- रू. किचा मुद्देमाल जप्त केला.

अंमली पदार्थ विरोधी पथक-२ कडुन राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत पथकाकडील पोलीस निरीक्षक,सुनिल थोपटे तसेच अंमली पदार्थ विरोधी पथक-२ कडील अधिकारी व अंमलदार हे चतुश्रृंगी पोलीस ठाणेच्या परीसरात दिनांक २७/०५/२०२३ रोजी पेट्रोलींग करीत असताना सहा.पोलीस उप-निरीक्षक,शिवाजी घुले यांना मिळालेल्या माहितीवरुन सापळा कारवाई करुन रेगुलस सोसायटी बालेवाडी गावठाणरोड पुणे येथील सार्वजनिक रोडवर सार्वजनिक ठिकाणी इसम नामे **१)तनुज मनोजकुमार कामब्रत,वय २२ वर्षे,रा.इशाना बिल्डींग, प्लॅट नं.७,भुसारी कॉलनी कोथरूड,पुणे २)जिवन बिजु टॉटम,वय २० वर्षे,रा.ईलाईट अम्पायर,बाणेर,पुणे यांच्या ताब्यात १,६६,२२५/- रु.कि.चा ऐवज त्यामध्ये ६५,०००/- रु किमतीचे एल.एस.डी, ९,७२५/- रू किचा ओझोकुश गांजा, ७१,५००/- रु किच्या एम.डी.एम.ए.च्या गोळया असा अंमली पदार्थ** जप्त करुन त्यांचे विरुध्द **चतुश्रृंगी पोस्टे येथे गु.र.नं.३५२/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii) (अ),२२(क),२९** प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

तसेच **समर्थ पोस्टे गु.र.नं.१५/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९** मधिल पाहिजे आरोपी नामे शशिकांत चांगदेव नलवडे हा पाच महिन्यांपासून सदर गुन्हयात फरार असलेल्या गुन्हेगाराचा वारंवार शोध घेत असताना पोलीस अंमलदार,योगेश मांढरे यांना माहिति मिळाले माहितीनुसार सदर इसम हा पुणे स्टेशन परिसरात गांजा विक्री करण्यासाठी येणार आहे. त्यानंतर सदर ठिकाणी सापळा लावुन मिळालेल्या माहितीवरुन बंडगार्डन पोस्टे हद्दीत पुणे रेल्वे स्टेशनचे एक्झीट गेटचे समोरील बालाजी रसवंती गृहासमोर, ताडीवाला रोड पुणे येथे इसम नामे **१)शशिकांत चांगदेव नलवडे,वय-२९ वर्षे,रा.मु.पो.धनगरवाडी,कोडोली,ता.जि.सातारा तसेच त्याचा साथीदार नामे २)प्रतिक युवराज ओहोळ,वय-१९ वर्षे,रा.मु.पो.सालसे,ता.करमाळा,जि.सोलापुर यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातुन एकुण १६,३५,१००/- रु किंचा ८१ किलो ७५५ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ** जप्त करुन त्यांचेविरुध्द **बंडगार्डन पो.स्टे येथे गु.र.नं.१६२/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब ),(ii),(क),२९** प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतीष गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे शहरकडील पोलीस निरीक्षक,सुनिल थोपटे, पोलीस उपनिरीक्षक,दिंगबर चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक,शुभांगी नरके, पोलीस अंमलदार, शिवाजी घुले, योगेश मांढरे,संतोष देशपांडे, संदिप जाधव, प्रशांत बोमादंडी,रविंन्द्र रोकडे,चेतन गायकवाड,मयुर सुर्यवंशी, महेश साळुंखे, साहिल शेख, संदिप शेळके, नितीन जगदाळे, आझीम शेख, युवराज कांबळे, दिनेश बास्टेवाड, महिला अंमलदार दिशा खेवलकर यांनी केली आहे.